सत्यमेव जयते

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१८/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १४/०२/२०१२

**निवडणूक तात्काळ**

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,(जिल्हाधिकारी, मुंबई, मुंबई उपनगर, धुळे, नंदूरबार,
अकोला, वाशिम, भंडारा व गोंदिया वगळून)

महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर,
नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर

**विषय:- जिल्हा परिषद/पंचायत समित्या व महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांची मतमोजणी**

महोदय/महोदया,

राज्यातील १० महानगरपालिका, २७ जिल्हा परिषदा व ३०९ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांची मतमोजणी दिनांक- १७/२/२०१२ रोजी करण्यात येणार आहे. मतमोजणीच्या प्रक्रियेसाठी योग्य रीतीने व व्यवस्थितपणे नियोजन करण्याच्या दृष्टीने आपण व्यक्तिश: लक्ष घालून खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणाबाबत संबंधित राजकीय पक्ष व उमेदवार यांना सविस्तर माहिती देण्यात यावी.

२. मतमोजणीच्यावेळी उपस्थित राहणारे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्याकरिता आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दयाव्यात.

३. सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वंकष उपाययोजना करण्यात यावी व आवश्यक वाटल्यास सीसी टि.व्ही. लावण्यात यावेत.

४. मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला प्रवेश देण्यात येऊ नये. यासाठी एक ये-जा नोंदवही ठेवण्यात यावी.

५. मतमोजणीची प्रक्रिया सुरळीतपणे व कोणत्याही प्रकारचा अडथळा न येता पार पाडण्याच्या दृष्टीने केलेल्या नियोजनाची रंगीत तालीम घेण्यात यावी.

६. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतमोजणी करण्यात येणार असल्याने मतमोजणीची प्रक्रिया जास्तीत जास्त ४-५ तासात पूर्ण होईल या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असल्यास अधिक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

७. मतमोजणीचा निकाल सर्व संबंधितांना तसेच आयोगाच्या कार्यालयाला सत्वर मिळेल याची व्यवस्था करण्यात यावी.

८. मतमोजणीच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यादृष्टीने पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा.

९. मतमोजणीच्यावेळी ई.सी.आय.एल. कंपनीचा एक तज्ज्ञ व ऑक्झिलरी डिस्प्ले युनिटची व्यवस्थादेखील करून घेण्यात यावी. ( जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या मतमोजणीकरिता)

१०. मतमोजणीच्या ठिकाणी आगीपासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने फायर टेंडरची व्यवस्था करण्यात यावी.

वर नमूद केल्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, असे आपणास मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार कळविण्यात येत आहे.

आपला,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Letter for Code of Conduct. Punedoc.doc/D.O.7